| MHKO110014572024 | नियमित दिवाणी दावा क्र. १४१/२०२४<br>निशाणी क्रमांक २० वरील आदेश<br>( श्री.अनिल नारायण कुलकर्णी विरुध्द श्रीमती प्रणिता प्रमोद कुलकर्णी वगैरे) |
|---|---|

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत कामी वादीचे कथन असे की, प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींविरुध्द वाटणीकरीता व कायम मनाई आदेश होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दावा दाखल करतेवेळी अनावधानाने वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जित घर मिळकतींचा समावेश दावेमध्ये करायचा राहून गेला आहे. त्यामुळे सदरच्या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ठ करणेसाठी. तसेच ३–अ प्रमाणे दावेमध्ये सरनामेमध्ये दुरुस्त करणेकरीता. तसेच घर मिळकतीमधील सहहिस्सेदार यांना पक्षकार करणे आवश्यक असलेने ३–ब प्रमाणे प्रतिवादी यांना समाविष्ठ करणेविषयी. तसेच ३– क प्रमाणे दावेचे कलम १ मध्ये १ब नंतर अर्जात नमूद मजकूर समाविष्ठ करणेसाठी. तसेच ३–ड प्रमाणे दावेच्या तपशिलामध्ये दुरुस्ती करणेसाठी. तसेच कलम ७ नंतर ७–अ असे लिहून त्यापुढे यातील प्रतिवादी क्रमांक ४ ते ७ हे घर मिळकतीमध्ये सहहिस्सेदार असलेने वाटपाचे कामी अडचण राहू नये म्हणून त्यांना या कामी फॉर्मल पक्षकार केले आहे. तसेच दावेचे कलम १० मध्ये १०अ नंतर सबपॅरा करुन त्या ठिकाणी अर्जात नमूद मजकूर लिहीणेविषयी परवानगी मिळणेविषयी विनंती केली आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार नाही. तसेच सदरची दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही व दावेचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत कामी प्रतिवादीतर्फे सदर अर्जाच्या पाठीमागील बाजूस म्हणणे देऊन प्रस्तुत अर्जास विरोध केला आहे. प्रस्तुत प्रतिवादींचे म्हणणे असे की, यातील प्रतिवादीने या कामी कैफियत दिली असून सदर कैफियतमधील पॅरा क्रमांक २ मध्ये घर मिळकती या कामी वाटणीकरीता दाखल केले नाहीत असे स्पष्टपणे नमूद करुन घर मिळकती या कामी दाखल केलेल्या नसलेने दावा कायेदशीर नसून तो फेटाळावा म्हणून विनंती केलेली आहे. परंतू त्यानंतर वादीतर्फे प्रतिवादीची कैफियत वाचून नंतर सदरचा अर्ज after thpught दिलेने सदरचा अर्ज फेटाळावा. वादीने मे.कोर्टातून एकतर्फी खोटी माहीती देऊन स्टॅटस्कोचा आदेश फसवून मिळवला आहे त्यामुळे वादी हा स्वच्छ हाताने आलेने नाहीतर तर मे.कोर्टाची फसवणूक करुन आदेश मिळवलेला आहे त्यामुळे प्रस्तुत अर्ज फेटाळावा. सदर दावेतील दुरुस्ती सोबत घराचे वॅल्यूएशन सब रजिस्ट्रार यांचेकडून करुन घेतलेला वॅल्यूएशन रिपोर्ट हजर केलेला नाही. त्यामुळे सदरचा दुरुस्तीमधील घराची किंमतच चुकीची आहे. त्या किंमतीवर विश्वास ठेवता येत नाही. त्यामुळेही सदरचा अर्ज बेकायदेशीर असून तो फेटाळणेत यावा. सदरचा अर्ज हा खोटया कारणांनी या कामातील निशाणी ०५ चे आर्जवर युक्तीवाद करु नये या उददेशाने केलेला आहे. यापूर्वी वादीला सर्व मिळकतींना सर्व वडीलोपार्जित मिळकतीत आहेत हे माहीती असताना फक्त शेत मिळकतींबाबत दावा करुन मे.कोर्टाची फसवणूक केलेली आहे. त्यामुळेही सदरचा अर्ज फेटाळणेत यावा. तसेच अर्ज देणेस कोणतेही कारण नाही फक्त प्रतिवादीतर्फे हरकत कैफियतमध्ये घेतलेने अर्ज दिला आहे. परंतू त्या अर्जामध्ये कोणत्या कारणांनी घर मिळकती सामील केल्या नाहीत याचा उल्लेख नाही. सबब, या सर्व कारणांचा विचार होवून प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

०४. प्रस्तुतचा अर्जाचे अवलोकन केले आणि वादीच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. यावरुन खालील मुद्दे माझ्या पुढे उपस्थित झाले त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांनी मागीतलेल्या दुरुस्तीमुळे त्यांचे मुळ दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे काय ? | ...नाही |
| २. | सदरची दुरुस्ती ही मुळ दाव्याच्या अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे काय ? | ... होय |
| ३. | काय आदेश ? | ...वादीचा अर्ज अंशत: मंजूर करणेत आला |

## –कारणमिमांसा–

**०५.** प्रस्तुत दावा, तसेच अर्ज व वादीच्या विद्वान विधिज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले. युक्तीवादा दरम्यान वादीच्या व प्रतिवादीच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांच्या अर्जातील मजकूराची पुनरावृत्ती केली आहे.

**०६.** प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर नियमात सांगितल्याप्रमाणे जर दाव्याचे स्वरुप बदलत नसेल व करण्यात येणारी दुरुस्ती ही पक्षकारातील वाद मिटवणेसाठी तसेच दावा गुणवत्तेवर निकाल होणेसाठी आवश्यक असेल तर सदर दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यास काही अडचण नाही. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द वाटणीकरीता व कायम मनाई आदेश होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. यातील प्रतिवादी तर्फे निशाणी २२/१ वर आळते येथिल सि.स.नंबर १०४ चे मुल्यांकनाची झेरॉक्स प्रत, तसचे २२/२ वर आळते येथिल सि.स.नंर १०१ चे मुल्यांकनाची झेरॉक्स प्रत हजर केलेली आहे.

**०७.** सबब दाव्याचे स्वरुप व वादीचे वादपत्रातील कथन पाहता वादीने मागितलेली दुरुस्ती ही दिल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. उलटपक्षी पक्षकारामध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी मदत होणार आहे. दुरुस्तीस मंजूरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. उलटपक्षी प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादींमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध होण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिवादी यांना पुरावा देणेची संधी असलेने सदर दुरुस्तीमुळे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी मागत असलेली दुरुस्ती ही प्रथमदर्शनी दाव्याची कार्यवाही लांबविणेच्या उद्देशाने दिसून येत नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्रमांक २ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्रमांक ३ करिता खाली आदेश पारीत करते.

## – आदेश –

१. वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी २०) प्रतिवादीने दाखल केलेल्या मुल्यांकन दाखल्याचे आणि वादीच्या पुराव्याच्या अधीन राहून अंशत: मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केलेली दुरुस्ती या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत वादपत्रात करणेची आहे.

३. वादी त्यांचे अर्जामध्ये मागत असलेली दुरुस्ती ३–ब ही नामंजूर करणेत येत असून. त्यासाठी वादीने कायदयातील तरतूदीनुसार अर्ज देणेत यावा.

४. वादीने सदर वादपत्राची दुरुस्त प्रत सत्वर द्यावी.

दिनांकः– ०७/०३/२०२५
ठिकाण – पेठवडगांव

( श्रीमती एस.जे.पेंडे )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पेठवडगांव